CMYK

दैनिक **आरंभ मराठी**

www.arambhmarathi.com

सुविचार

आत्मविश्वासाने कोणतेही आव्हान सहज पार करता येते.



रान झालं आबादानी, वाळणाऱ्या उसाला आशेची हिरवळ

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 105 ■ वर्ष 2 रे ■ रविवार दि.25 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# सव्वालाख क्विंटलची मागणी, पुरवठा केवळ २५००० क्विंटल

## यंदा खरीप हंगामात महाबीजच्या सोयाबीन बियाण्याचा तुटवडा

### ६ लाख ४३ हजार हेक्टर क्षेत्रावर होणार खरिपाची पेरणी

### जिल्ह्यात उडीद, मूग आणि तुरीचे पेरणीक्षेत्र नगण्य

आरंभ मराठी | धाराशिव

**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाद्वारे (महाबीज) यावर्षीच्या खरिप हंगामात धाराशिव जिल्ह्याला जवळपास २५ हजार क्विंटल बियाण्यांचा पुरवठा केला जाणार आहे. परंतु, मागणी मात्र १ लाख २५ हजार क्विंटल बियाण्याची आहे. त्यामुळे यावर्षी महाबीजच्या बियाण्याचा तुटवडा जाणवणार असून, शेतकऱ्यांना इतर खाजगी कंपनीच्या बियाण्यावर विसंबून राहावे लागणार आहे. बियाण्याचा तुटवडा असल्यामुळे दरवर्षी २५ किलोची असणारी सोयाबीन बियाण्याची बॅग यावर्षी महाबीजने फक्त २२ किलोची केली आहे.**



यंदाचा खरीप हंगाम आता तीन आठवड्यांवर आलेला आहे. सध्या वैशाख महिन्यातच जिल्ह्यात बऱ्याच भागात दमदार पाऊस होत असल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीच्या कामाला सुरुवात केली आहे. परंतु, अवकाळी पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याने यावर्षी पेरणीपूर्वी मशागतीच्या कामात व्यत्यय आला आहे. सध्या पेरणीसाठी आवश्यक खते, बी-बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. सोयाबीन बियाण्यांची आतापासूनच शेतकऱ्यांकडून विक्रेत्यांकडे विचारणा होत आहे. त्यामुळे बियाणे बाजारात लगबग सुरू झालेली आहे. यामध्ये विविध बियाणे कंपन्यांसोबतच महाबीजचेही बियाणे बाजारात राहणार आहे. सद्यस्थितीत सोयाबीन, मूग, उडीद आणि तुरीचे बियाणे बाजारात दाखल झाले आहे. धाराशिव जिल्ह्यात खरीप हंगामात ६ लाख ४३ हजार हेक्टर पेरणीक्षेत्र प्रस्तावित करण्यात आलेले आहे. यापैकी साधारण ४ लाख ७६ हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी होईल असा अंदाज आहे. मृग नक्षत्रात पाऊस समाधानकारक झाल्यास पेरणी क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बियाण्याची मागणी देखील वाढू शकते. महाबीजच्या बियाण्यांपेक्षा दुप्पट बियाणे खाजगी कंपन्यांचे बाजारात येऊ शकते. महाबीज बियाण्यांची मागणी आणि पुरवठा यात दरवर्षी मोठी तफावत असल्यामुळे उपलब्ध होणारे बियाणे पहिल्या टप्प्यातच संपण्याची शक्यता आहे. यावर्षी महाबीजकडे जवळपास १ लाख २५ हजार क्विंटल सोयाबीन बियाण्याची मागणी केलेली आहे. परंतु, महाबीजकडे पुरेशा प्रमाणात बियाणे उपलब्ध नसल्यामुळे केवळ २५००० क्विंटल बियाणे धाराशिव जिल्ह्यासाठी उपलब्ध होऊ शकते. शेतकऱ्यांची मागणी महाबीजलाच असल्यामुळे सोयाबीनचे २५ हजार क्विंटल बियाणे पुरेल का? हा प्रश्न आहे. सध्या पहिल्या टप्प्यात सोयाबीनचे ११ हजार ९६२ क्विंटल बियाणे येणार आहे. त्यापैकी ८ हजार ९७४ क्विंटल बियाणे प्राप्त झालेले आहे.

### तूर, मूग आणि उडदाचे क्षेत्र नगण्य

यावर्षी तूर, मूग आणि उडदाचे क्षेत्र नगण्य असणार आहे. यावर्षी तुरीचे १७९५ क्विंटल, मुगाचे ३३८ क्विंटल आणि उडदाचे २२८३ क्विंटल बियाणे उपलब्ध होणार आहे. रब्बी हंगामात ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. तर खरीप हंगामात शेतकऱ्यांची सोयाबीनलाच पहिली पसंती आहे. त्यामुळे यावर्षी तूर, मूग आणि उडदाचे क्षेत्र अतिशय नगण्य असणार आहे.

### यंदा २२ किलोची बियाण्याची बॅग

महाबीजकडे बियाण्याचा तुटवडा असल्यामुळे यावर्षी २६ किलोची बॅग २२ किलोपर्यंत कमी केली आहे. तर काही व्हरायटी पूर्वीप्रमाणेच ३० किलोच्या बॅग मध्ये आहेत. यंदा नवीन वाणाचे बियाणे ८५ रुपये किलोप्रमाणे मिळणार आहे. तर १५८, २२८, ७१ आणि ३३५ या जुन्या वाणाचे बियाणे ७३ रुपये किलो दराने मिळणार आहे.

### यंदा बियाण्याचा तुटवडा जाणवणार

यंदा महाबीजकडे पुरेसे बियाणे उपलब्ध नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे मागणी आहे तेवढे बियाणे उपलब्ध होणे अशक्य आहे. तरीही जास्तीत जास्त बियाणे उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. दुसऱ्या टप्प्यात अजून बियाणे उपलब्ध होईल. शेतकऱ्यांची पहिली पसंती महाबीज हीच असते. यावर्षी बीबीएफ तंत्राने पेरणी करावी यासाठी २२ किलोची बियाण्याची बॅग केलेली आहे.

-राजू माने
जिल्हा व्यवस्थापक, महाबीज,

## वैराग्य महामेरू गोरोबाकाकांची मोरावर स्वारी,ऊटीवारीला नयनरम्य देखावा

आरंभ मराठी | तेर



वैशाख महिन्यात येणाऱ्या एकादशीला ऊटी वारी म्हणून ओळखले जाते.या वारी निमित्ताने चंदन उगळून केलेल्या ऊटीपासून संत गोरोबाकाकांची स्वारी मोरावर स्वार झाल्याचा नयनरम्य देखावा साकारण्यात होता. प्रती पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र तेर येथील संत गोरोबाकाका यांच्या समाधी मंदिरातील समाधीवर देखावा साकारण्यात आला होता.भर वैशाख वणव्यात येत असलेल्या या वारीला काकांच्या समाधीला थंड ओलावा मिळावा म्हणून चंदनाचा लेप लावतात. साधारण सात किलो चंदन उगाळून त्याच्या गोळी तयार करून विशिष्ट प्रकारचा देखावा तयार केला जातो.यावर्षी मोरावर संत गोरोबाकाका स्वार झालेला देखावा तयार करण्यात आला होता.वैशाख पोर्णिमेपासून चंदनाच्या खोडावर हे गंध उगाळले जाते. द्वादशीदिवशी शनिवारी पहाटेपासून हा नयनरम्य देखावा डोळ्यात साठविण्यासाठी भाविक एकादशीला मुक्कामी मंदिरात थांबतात. साधारण पहाटे पाचपासून सकाळी आठ वाजेपर्यत हा देखावा भाविकासाठी दर्शनासाठी खुला ठेवला जातो. त्यानंतर ही ऊटी उतरविण्यात येते.हा देखावा वर्षातून एकदा केला जातो. तो पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते.ऊटीवारीला होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन मंदिर समितीच्या प्रशासक रूपाली कोरे,निरिक्षक अतूल नळणीकर, व्यवस्थापक साहेबराव सौदागर यांनी भाविकांना सुलभ दर्शनासाठी व्यवस्था उपलब्ध करून दिली होती.

## कुलस्वामिनीचे दर्शन घेऊन रितु खोकर यांनी स्वीकारला पोलिस अधीक्षकपदाचा कार्यभार

### सहकुटुंब घेतले श्रीतुळजाभवानी मातेचे दर्शन

आरंभ मराठी | तुळजापूर



नवनियुक्त पोलीस अधीक्षक रितु खोकर यांनी शनिवारी सकाळी श्री तुळजाभवानी मंदिरात जाऊन सहकुटुंब देवीचे दर्शन घेतले.त्यानंतर त्यांनी पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारला.यापूर्वी रितु खोकर सांगली येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होत्या. त्यांची धाराशिव जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. दर्शनावेळी तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक अरविंद बोळंगे यांनी त्यांचे स्वागत केले. दर्शनानंतर मंदिर संस्थानच्या वतीने त्यांना श्रीतुळजाभवानी मातेची प्रतिमा, कवड्याची माळ व महावस्त्र प्रदान करून सत्कार करण्यात आला. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख, पोलिस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक विनोद इज्ञपवार, सहायक पोलिस निरीक्षक अर्जुन चौधर, मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, प्रशांत जाधव, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पराडे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रामपंचायतीने महावितरण कार्यालयाला ठोकले टाळे

आरंभ मराठी | धाराशिव



तालुक्यातील शेकापूर ग्राम पंचायतीने थेट महावितरण () कार्यालयाला थेट कुलूप लावून सिल करण्याची कारवाई केली. शेकापूर ग्रामपंचायतीचा तब्बल ८४ लाख ६५ हजार रुपये कर थकित असल्याने व महापारेषण कार्यालयाकडूनही २८ लाख ४० हजार ४०० रुपये थकबाकी असल्याने ही कडक पावले उचलण्यात आली आहेत. या अगोदर १६ मे रोजी महावितरण व महापारेषण या दोन्ही कार्यालयांना कर भरण्यासाठी ७ दिवसांची नोटीस देण्यात आली होती. मात्र मुदत संपल्यानंतरही कर न भरल्याने ग्रामपंचायतीने २४ मे रोजीच थेट कारवाई करत कार्यालयावर कुलूप ठोकले.ग्राम पंचायतीच्या या कडक भूमिकेमुळे इतर थकबाकीदार कार्यालयांवरही दडपण येण्याची शक्यता आहे. महसुलाच्या वसुलीसाठी शेकापूर ग्रामपंचायतीने दाखवलेले धाडस हा चर्चेचा विषय ठरला आहे. यावेळी सरपंच पुष्पा किरण लगदिवे, ग्रामसेवक संजय आडे, सदस्य लगदिवे, फेरे अम्रपाली, राणी बुरुड, मजुषा कुरकरे , कांचन होवडे, पोलीस पाटील मल्हारी कांबळे, ग्रामस्थ नंदू लोकदिवे, शक्ती कांबळे, अरुण साबळे,राहुल विधाते, सुरज लगदिवे,शिवा लगदिवे, शिवाजी विधाते आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## गांजा सेवन करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा शहरातील हुतात्मा स्मारकच्या गार्डनमध्ये झाडाखाली चीलिंगमधून गांजा ओढणाऱ्या दोघांना उमरगा पोलिसांनी रंगेहात पकडले. या प्रकरणी दोघाविरुद्ध अमली पदार्थविरोधी कायद्यान्वये (एन डी पी एस ॲक्ट) स्वतंत्र दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उद्धव पांडुरंग पाचंगे (वय ३७) आणि महेश कमलाकर वाडेकर (वय ३१, दोघे रा. हिप्परगा राव ता. उमरगा) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सदर आरोपी हे दुपारी पावणे दोनच्या सुमारास उमरगा शहरात हुतात्मा स्मारकच्या गार्डनमध्ये एका झाडाखाली बसून चिलीममध्ये गांजा भरून त्याचे सेवन करत होते. गस्तीवर असलेल्या उमरगा पोलिसांच्या हा प्रकार निर्दशनास आला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोघांना ताब्यात घेतले, त्यांच्याकडून गांजा आणि चिलीम जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सरकारतर्फे फिर्यादी दिली असून उद्धव पाचंगे आणि महेश वाडेकर यांच्या विरोध एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ चे कलम ८ (सी) आणि २७ अन्वये उमरगा पोलीस ठाण्यात स्वतंत्र दोन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

## 'शासकीय जागेवर पंधरा दुकान गाळ्याचे बेकायदेशीर बांधकाम तात्काळ थांबवा'

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील टोल नाक्याच्या शेजारी जमीन गट नं. २११ राष्ट्रीय महामार्गावर चौपदरीकरणासाठी भारत सरकारने संपादीत केलेल्या जमिनीवर व सर्विस रोडवर सुमन नवनाथ नवगिरे ह्या बेकायदेशीर अतिक्रमण करून १५ दुकान गाळ्याचे बांधकाम करीत असून ते बांधकाम तात्काळ थांबवावे अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभाग तुळजापूर यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते अंबादास बाळासाहेब वऱ्हाडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनात असे नमूद केले आहे की,तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील टोल नाक्याच्या शेजारी जमीन गट नं. २११ नॅशनल हायवे च्या चौपदरीकरणासाठी भारत सरकारने संपादीत केलेल्या जमिनीवर व सर्विस रोडवर सुमन नवनाथ नवगिरे ह्या बेकायदेशीर अतिक्रमण करून १५ दुकान गाळ्याचे बांधकाम करत असून ते तात्काळ थांबवीण्यात यावे या जागेचा सुमन नवनाथ नवगिरे यांचा - कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध नसून तसेच त्यांच्या मालकीची जमीन सुध्दा नाही. तसेच शासनाची तसेच कोणत्याही कार्यालयाची बांधकाम परवानगी घेतलेली नाही.अशी निवेदनाद्वारे तक्रार देण्यात आली आहे.या निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते अंबादास वऱ्हाडे यांची स्वाक्षरी आहे.

## शेती खरेदी-विक्री करताना रस्त्याची नोंद बंधनकारक

### शेत रस्त्याचे वाद टाळण्यासाठी महसूल विभागाचा निर्णय

आरंभ मराठी | धाराशिव

**शेत रस्त्यामुळे गावोगावी होणारे वाद टाळण्यासाठी आता शेतजमीन वाटपात मोजणी अनिवार्य केली आहे. शेतजमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणीत शेत रस्त्यांची नोंदणी करणे बंधनकारक करण्याचा निर्णय महसूल विभागाने नुकताच घेतला आहे. त्यामुळे शेत रस्त्यांमुळे होणारे वाद पुढील काळात कमी होण्याची शक्यता आहे. महसूल विभागाने मागील महिन्यात नस्ती अदालत नावाचा उपक्रम सुरू करून शेत रस्त्यांचे वाद तहसीलदारांच्या माध्यमातून मिटवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. या दोन्ही निर्णयामुळे वर्षानुवर्षे सुरू असलेले शेत रस्त्याचे वाद कमी होतील.**



महसूल विभाग, मुद्रांक व नोंदणी विभागाची शेतजमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणीमध्ये शेत रस्त्याचा समावेश बंधनकारक करणे व शेत रस्त्याच्या नोंदी सातबाराच्या इतर हक्क घेण्यासंदर्भात जानेवारीत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला होता. या बैठकीत सर्व शेत रस्त्यांच्या सातबारा उताऱ्यावर इतर हक्कांत नोंदी घेण्यात याव्यात, शेत रस्त्यांवरील अतिक्रमणांबाबत विधी व न्याय विभाग, संबंधित तहसीलदार व कृषी विभागाकडून माहिती घ्यावी, शेतामध्ये जाण्या - येण्यासाठी व शेतमाल वाहतुकीसाठी रस्ता असल्याशिवाय दस्त नोंदणी करू नये यावर चर्चा करण्यात आली होती. अस्तित्वातील शेत रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत, शिवरस्ते व पाणंद रस्त्यांना क्रमांक दिले जावेत, रस्त्यासाठी भूसंपादन करून संबंधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याच्या सूचना बैठकीत दिल्या होत्या. गाव नकाशावर असलेल्या शिवरस्ते व पाणंद रस्त्यांना क्रमांक देऊन त्याची यादी जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींना द्यावी, अशा सूचना जमाबंदी आयुक्तांना नुकत्याच दिल्या आहेत. शेतामध्ये जाण्या-येण्यासाठी रस्ता देताना यांत्रिकीकरणाचा विचार करून ट्रॅक्टर जाईल इतक्या रुंदीचा रस्ता देण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. त्यामुळे यापुढे शेत रस्त्यांच्या कारणामुळे वाद होऊ नये यासाठी शासकीय पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत.

### पाचशे रुपये मुद्रांक शुल्क अनिवार्य

शेतजमिनीचे वाटप करताना मोजणी अनिवार्य करून वाटपाच्या दस्तास मुद्रांक शुल्क ५०० रुपये व वाटपाच्या दस्ताची नोंदणी करणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे शेत रस्ता, जमीन मोजणीबाबतचे भविष्यात उद्भवणारे वाद होणार नाहीत अशी शक्यता आहे.

## जास्त दराच्या निविदा मंजूर न करण्याचे फडणवीस सरकारचेच धोरण,उबाठा गटाचा प्रसिद्धीसाठी स्टंट

### भाजपचा आरोप

आरंभ मराठी | धाराशिव






१४० कोटींच्या नगर पालिकेच्या रस्ते कामांच्या निविदेवरून शिवसेना उबाठा गटाच्या स्थानिक नेत्यांकडून प्रसिद्धीसाठी स्टंट केला जात आहे. वास्तविक पाहता नगर विकासच्या कामात राज्यात कोठेही जास्तीच्या दराने निविदा मान्य केली जाणार नाही, असा धोरणात्मक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. ही बाब जगजाहीर असताना मात्र शहर खड्ड्यात घालणारे स्वतःचे अपयश झाकण्यासाठी आंदोलनाला यश आल्याचा कांगावा करीत आहेत, असा टोला भाजपच्या वतीने करण्यात आला आहे.यासंदर्भात भाजपने म्हटले आहे की,मागणी नसताना भुयारी गटार योजना शहराच्या माथ्यावर थोपवली गेली. त्यातून कोणाचे उखळ पांढरे झाले हे सर्वांनाच माहीत आहे. भुयारी गटारीच्या कामामुळे शहरातील सगळे रस्ते खड्ड्यात गेले. मात्र त्याच्या दुरुस्तीसाठी सत्तेत असताना निधी आणावा अशी यांना गरज वाटली नाही. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धाराशिव शहरातील रस्त्यांच्या कामासाठी निधी आणला.असे असताना स्वतःचा अपयशी कार्यकाळ झाकण्यासाठी आंदोलनाचा स्टंट करत असल्याचा आरोप अमित शिंदे यांनी केला आहे. आंदोलनामुळे शहरवासीयांच्या खिशातले २२ कोटी रुपये वाचले असल्याचा खोटा बनाव करणारे बायोमायनिंग कामाच्या वेळी तोंड शिवून का गप्प बसले होते घनकचऱ्याचे बायोमायमिंगची निविदा १७ % जास्तीच्या दराने काढली तेंव्हा का आंदोलन केले नाही, १७ टक्क्यांनी जास्तीची निविदा भरल्यानंतर कोणाच्या घशात तो पैसा गेला, गरज नसताना आणि शहरवासीयांची मागणी नसताना भूमिगत गटार योजना राबविण्यात कोणाचे हित होते, टक्केवारीसाठी अजिबात गरजेची नसलेली योजना राबवताना रस्ते खड्ड्यात कोण घातले? त्यावेळी सत्तेत असणारे आमदार आणि खासदार यांनी शहरातील रस्त्यांसाठी का निधी आणला नाही ? त्यावेळी सरकार तुमचेच होते, तुमचे मुख्यमंत्री होते,आमदार,खासदारही तुमचेच होते मग रस्त्यासाठी निधी आणावा अशी गरज तुम्हाला का वाटली नाही ? केवळ कांगावा करण्यापेक्षा याचे उत्तरही जनतेला द्या असे आव्हान माजी नगराध्यक्ष शिंदे यांनी दिले आहे.

CMYK

# भारतीयत्वाचा विचार वारसा सांगणारा प्रवाह




'सामाजिक समतेचा प्रवाह' हास्मृतिशेष प्राध्यापक फकरुद्दीन बेन्नूर यांच्या स्मृतींना समर्पित ग्रंथ आहे.प्रा.सूर्यनारायण रणसुभे हे या ग्रंथाचे मुख्य संपादक आहेत तर कलीम अजीम,सरफराज अहमद,चंपत बोड्डेवार,विवेक घोटाळे यांचाही संपादन कार्यात सहभाग आहे. सात वर्षांपूर्वी बेन्नूर सरांचे निधन झाले,त्यानंतर बहूआयामी व्यक्तिमत्त्व साकारलेल्या प्रा.बेन्नूर यांच्या विचारप्रसाराला थोडाफार हातभार लागावा या हेतूने या स्मृतिग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे.त्यासाठी अनेक मान्यवरांचा हातभार लागला आहे.त्यात बेन्नूर सरांचे मान्यवर,विचारवंत,लेखक स्नेही,मित्र,चाहते,विद्यार्थी यांनी आपल्या आठवणी,भूमिका आणि विचार मांडले आहेत. ज्यातून भारतीय मुस्लिमांची कालची,आजची सामाजिक,राजकीय,धार्मिक स्थिती विशद करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.मुस्लिम समाज हा भारतीय समाजाचा अविभाज्य घटक आहे.फाळणीनंतर देशातील मुस्लिमांविषयी अनेक अपप्रचार चालवण्यात आले पण स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीनंतरसुद्धा हा समाज सर्वतऱ्हेची संकटे झेलत ठामपणे उभा आहे.भारतीयत्व हा इथल्या हिंदू-मुस्लिम जनतेच्या एकोप्याचा गाभा आहे. ज्याला भारतीय संविधानाचे बळकट अधिष्ठान लाभले आहे. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी आणि प्रबोधनात्मक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या प्रा.बेन्नूर यांच्यानिधनाने फार मोठी वैचारिक पोकळी निर्माण झालेली असताना,त्यांनी केलेल्या समग्र कार्याचा विस्तृत आढावा या ग्रंथामधून घेण्यात आला आहे. इस्लामी परंपरेला सहिष्णुतेचा मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला असतानात्याकडे समाजद्रोही प्रवृत्ती सातत्याने दुर्लक्ष करत आल्यानेप अप्रचाराला मोकळे रान मिळत आले आहे. प्रा.बेन्नूर यांनीरतातील गंगाजमनी संस्कृतीची जिवंतता टिकून राहावी यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत प्रामाणिकपणे प्रयत्न केले.सामाजिक समन्वयाचा महान वारसा सांगणारी सर्वधर्मातील संत सज्जनांची शिकवणच मानवतेचा खरा आधार असल्याची त्यांची स्पष्ट धारणा होती.त्यामुळेच आपल्या हयातीत लेखन,संभाषणातून प्रा.बेन्नूर यांनीसंपूर्ण महाराष्ट्रात आपले विचारअनुयायी निर्माण केले.बेन्नूर सरांच्या पन्नास वर्षांच्या वैचारिक प्रवासाचेसाक्षिदार असलेले डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी आपल्या हृदय आठवणी स्मृतिग्रंथात मांडल्या आहेत.बेन्नर सर आपल्यातून अचानक निघून गेल्याने त्यांचे बरेचसे वैचारिक साहित्य अप्रकाशितच राहिले आहे.या स्मृतिग्रंथाच्या निमित्ताने त्यांची ग्रंथसंपदा मराठी वाचकांपुढे येण्यास सुरुवात झाली.एकूण २९ लेखांच्या या संकलनाचे तीन विभाग करण्यात आले आहेत.पहिल्या विभागात या विषयातील ज्येष्ठ अभ्यासकांचे लेख मराठीत उपलब्ध झाले आहेत.तर दूसऱ्या विभागात मराठीतून लेखन करणाऱ्या अभ्यासू मंडळीनी आपले विचार मांडले आहेत.पुस्तकाचा तिसरा आणि अखेरचा विभाग हा बेन्नूर सरांविषयीच्या आठवणींचा आहे.त्यातून त्यांचे सर्वसमावेशक व्यक्तिमत्व उलगडत जाते. एकूणच एका द्रष्ट्या विचारवंताला वाहिलेली ही शब्दसुमनांजलीच ठरावी. सध्याच्या विवेकशून्य काळात आपण प्रतिक्रियावादी न होता विवेकवादी होऊन हिंदू-मुस्लिम समन्वयाचा विचार मांडण्याच्या प्रमुख हेतूने हा ग्रंथनिर्मितीचा प्रपंच करण्यात आल्याचे कलीम अजीम सुरुवातीलाच स्पष्ट करतात.मुस्लीम संस्कृती,भारतीयत्व आणि राष्ट्रियत्व व व्यक्ती आणि विचार अशा तीन विभागात पुस्तक आकारास आले आहे शेवटी आवश्यक परिशिष्टही देण्यात आले आहे.ज्येष्ठ विचारवंत अब्दुल कादर मुकादम यांच्या लेखाने पुस्तकाचा आरंभ होतो.महाराष्ट्री संस्कृती आणि मराठी मुसलमान या विषयावर अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी मुकादम सरांनी या लेखातून केली आहे.महाराष्ट्रातल्या मुस्लिमांची जडणघडण आणि इस्लामचे महाराष्ट्रातले आगमण यावर प्रकाशझोत टाकत महत्त्वाचे ऐतिहासिक संदर्भ देत मुकादम सरांनी मराठी संस्कृतीच्या विकासात मुस्लिम समाजाच्या भरीव योगदानावर दृष्टिक्षेप टाकला आहे.छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी मराठी मुसलमानांना आपल्या स्वराज्यात,संस्थानात सर्वांच्या बरोबरीची वागणूक दिली,त्यानंतर मात्र ती परंपरा आता खंडित झाली असल्याची खंत मुकादम सरांनी व्यक्त केली आहे,याकडे महाराष्ट्रातील सुजाण नागरीकांनी गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आज निर्माण झाली आहे.महाराष्ट्रामधील कोकणी मुस्लिमांविषयी फिरोज अशरफ यांनी महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत.सागरकिनारे लाभलेल्या कोकणात प्राचीन काळापासून व्यापाराच्या निमित्ताने अरब मुस्लिम यांची ये जा होत आली आहे. व्यापाराच्या माध्यमातून अर्थकारण आणि पुढे सामाजिक अभिसरण घडत आल्याचा इतिहास आहे.सागरी किनारपट्टीचे रक्षण करण्याची जबाबदारी शिवकाळापासूनच दर्यावर्दी मुस्लिम सरदारांकडे राहिली आहे.जी त्यांनी अतिशय निष्ठापूर्वक निभावल्याचा आजवरचा इतिहास आहे.शिवरायांच्या सर्वसमावेशक स्वराज्याची इमानेइतबारे सेवा करणाऱ्या कोकणी मुसलमानांनी राजकीय सत्तेची कधीही आकांक्षा ठेवली नाही असे फिरोज अशरफ या लेखात नमूद करतात. सुफी परंपरा आणि भारतीय इस्लाम यावरविचारवंत असगरअली इंजिनिअर यांनी अभ्यासपूर्ण कटाक्ष टाकला आहे. ज्यातून इस्लाम धर्माचा समतावादी आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन अधोरेखीत होतो.सुफी हा विचारसर्व मानवांना प्रेमाच्या धाग्यात गुंफणारा शास्वत विचार आहे.भारतीयत्वाचा तो मूळ गाभा आहे.आध्यात्माच्या माध्यमातून इस्लामची मानवतावादी तत्त्वे सर्वसामान्य भारतीयांपर्यंत पोहोचविण्यात सुफीझम चा महत्वाचा वाटा आहे.रुढीवादी इस्लामपेक्षा बहूसंख्य जनतेला सुफीवाद विशेष जवळचा वाटला तसेच सुफीसंतांनी केलेल्या सामाजिक कार्यांचाही ठसा भारतीय समाजावर खोलवर उमटलेला असल्याचे दिसून येते.एकूणच सामाजिक समन्वयासाठी सुफी विचाराने आपले मोठे योगदान दिले असल्याचे असगरअली इंजिनिअर यांच्या लेखामधून स्पष्ट होते.मुसलमान आणि सुफी प्रवाह या लेखातून डॉ.रणसुभे यांनी भारतातील सद्य राजकीय स्थितीचा आढावा घेतानाच सुफी विचाराच्या प्रवाहामुळे महाराष्ट्रातील विविध भक्ती संप्रदायांमध्ये कसे वैचारिक आदानप्रदान घडले आणि त्यातून सामाजिक समतेला कशी बळकटी आली याकडे लक्ष वेधले आहे.प्रा.बेन्नूर यांनी सुफी विचार प्रवाहाचा प्रचार,प्रसार करण्यासाठी कसे आपले आयुष्य वेचले याचाही संक्षिप्त आढावा या लेखात घेतला गेला आहे. प्रसिद्ध संतसाहित्यिक डॉ.यू.म.पठाण यांनी 'भारतातील हिंदू-मुस्लीम समस्या' या लेखामधून बरेच ऐतिहासिक संदर्भ देत या विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.यातून स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनचे मुस्लीमांचे सामाजिक,राजकीय क्षेत्रातले योगदान काय होते याचीविस्तृत चर्चा करण्यात आली आहे. त्यामुळे देशउभारणी कार्यात हिंदूंच्या बरोबरीने मुस्लीम समाजदेखील कसा कार्यरत होता याची माहिती मिळते.मुस्लीमांवर बिनबुडाची टीका करणाऱ्या मुस्लीमद्वेष्ट्या प्रवृत्तीला सडेतोड उत्तर देणारी मांडणी या लेखातून झाली आहे. 'अशोक,अकबर,नेहरु आणि त्यांची सौहार्द विषयक धारणा' या लेखामधून हयातमहंमद पठाण यांनी भारतीयत्वाच्या जडणघडणीचीच कहाणी सांगितली आहे. आदर्श राज्यकर्त्यांच्या तळमळीतून आजच्या भारताचीकशीउभारणी झाली आणि धर्मवादी राजकारणाचा निर्माण झालेला धोका याचे अभ्यासपूर्णविवेचन या लेखातून करण्यात आले आहे.आधुनिक दृष्टीप्रदान करणाऱ्या आणि देशाला प्रगतीपथाकडे नेणाऱ्यातीन ठळक राज्यकर्त्यांविषयीची वेगळी मांडणी इथे झाली आहे. 'सहिष्णुतेचे दोन प्रबोधनपुरुषः खुसरो-इब्राहिम' यालेखातून सरफराज अहमद यांनी साहित्य आणि सांस्कृतिक प्रवाहाकडे लक्ष वेधले आहे.आजच्या भारतीयत्वाच्या जडणघडणीमागे कितीतरी सामाजिक,सांस्कृतिक घटकांचे योगदान असल्याचा इतिहास या लेखातून समजून घेता येतो.प्रा.फकरुद्दीन बेन्नूर यांच्या तळमळीच्या विषयांचीसांगोपांग चर्चा 'सामाजिक समतेचा प्रवाह' या ग्रंथातूनघडली आहे याविषयी मुळीच शंका नाही.






भरत यादव
9890140500

पुस्तकाचे नावः सामाजिक समतेचा प्रवाह

मुख्य संपादकः डॉ.सूर्यनारायण रणसुभे

प्रकाशकः द युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स,पुणे

पृष्ठससंख्याः ३३२

मूल्यः तीनशे रुपये.

## मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा

### मंत्री अतुल सावे यांच्याकडे दिव्यांग कल्याण विभाग

आरंभ मराठी | मुंबई

मंत्री छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा विभाग तर मंत्री अतुल लिलावती मोरेश्वर सावे यांच्याकडे दिव्यांग कल्याण विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे. याबाबतची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने प्रसिद्ध केली आहे.

## मतदारांसाठी मतदान केंद्राबाहेर मोबाईल ठेवण्याची सुविधा देणार

### निवडणूक आयोग प्रचाराच्या नियमांमध्ये सुधारणा

आरंभ मराठी | मुंबई

मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदान दिवशीच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे तसेच, प्रचारासाठीची मर्यादा देखील नव्याने निश्चित करण्यात आली असल्याचे जाहीर केले आहे. हे निर्णय लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ आणि निवडणूक आचारसंहिता, १९६१ यांच्याशी सुसंगत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये मोबाईल फोनचा वाढता वापर लक्षात घेता, तसेच वृद्ध, महिला आणि दिव्यांग मतदारांना येणाऱ्या अडचणींचा विचार करता, आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेरच मोबाईल ठेवण्याची सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत केवळ बंद अवस्थेतील मोबाईल्स नेण्यास परवानगी राहील. प्रवेशद्वाराजवळ मोबाईल ठेवण्याची ही सुविधा दिली जाणार असून, मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास परवानगी दिली जाणार नाही.

## सहकार चळवळीच्या वाढीसाठी पूर्ण सहकार्य-पवार

आरंभ मराठी | कोल्हापूर

राज्याच्या आणि देशाच्या विकासात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी सहकार क्षेत्रातही काळानुसार बदल करणे आवश्यक असून सहकार चळवळ टिकण्यासाठी आणि वाढण्यासाठी आवश्यक सहकार्य करु, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील विश्वनाथराव पाटील मुरगूड सहकारी बँकेच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, बँकेचे चेअरमन प्रवीणसिंह विश्वनाथराव पाटील, माजी आमदार व बिद्री साखर कारखान्याचे चेअरमन के.पी. पाटील, माजी आमदार व अन्नपूर्णा शुगर फॅक्टरीचे चेअरमन संजयबाबा घाटगे, गोकुळ दूध संघाचे चेअरमन अरुण डोंगळे, शेतकरी संघाचे चेअरमन बाबासाहेब शिंदे, गोकुळ दूध संघाचे संचालक युवराज पाटील, बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने, बिद्री सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मनोजभाऊ फराकटे, विश्वनाथराव पाटील मुरगूड बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास चौगले, बाबासाहेब पाटील - आसुर्लेकर, अविनाश जोशी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# इतिहासाचा अभ्यास करताना..



आपण बऱ्याच वेळा ऐकले आहे की अनेक भारतीय राजे युद्धात जिंकायचे पण तहात हरायचे किंवा युद्धात पराभव दिसत असल्यास यशस्वी माघार कशी घ्यावी याची कोणतीही योजना त्यांनी अखल्याचे दिसत नाही. पण ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत हे कधीच घडले नाही. त्यांनी आखलेल्या प्रत्येक योजनेत जर आपला पराभव होणार असेल किंवा काही दगा- फटका झालाच तर पुढे काय करायचे याचा विचार व तशा सूचना त्यांनी आपल्या सर्वच महत्त्वाच्या सहकाऱ्यांना दिलेल्या असे. अफजलखानाचा वध व आग्र्याहून सुटका यासारख्या अनेक प्रसंगांमध्ये याबद्दलचे स्पष्ट पुरावे मिळतात. बादशाहकडून आपल्याला अटक होईलच हे आधी माहीत नसतानाही अटक झालीच तर बाहेर कसं पडायचं आणि कशाप्रकारे महाराष्ट्रात परत यायचं याबद्दलचं आधीच नियोजन केलेलं असल्याचं आपल्याला अनेक ऐतिहासिक दस्तऐवजांवरून दिसून येतं. अफजलखानाच्या भेटीस जातांना सुद्धा काही विपरीत घडले तर पुढे काय करावे याबद्दलच्या सर्व सूचना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिलेल्या होत्या.छत्रपती शिवाजी महाराजांनी बादशाहच्या काळकोठडीतून स्वतःची सुटका कशी करून घेतली, हा एक खूप कठीण प्रसंग होता. याबद्दल आज उपलब्ध माहितीनुसार ही एक घटना महाराजांच्या कार्य कौशल्याची, दृष्टिकोनाची, योग्य निर्णय क्षमतेची, माणसं जोडण्याच्या प्रक्रियेची, आपल्या सभोवताली असणाऱ्या माणसांमध्ये आपल्याबद्दल विश्वास निर्माण करण्याची, त्यांना आपलंसं करण्याची, अगदी यातून दिल्लीचा बादशाह औरंगजेब हा सुद्धा सुटला नाही याची आपल्याला सतत जाणीव होत राहते, पहारेकरी वर्ग, त्याचे प्रमुख, बादशाहच्या दरबारातील दरबारी मंडळी व स्वतः बादशाह या सर्वांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष किंवा अनावधानाने मिळालेल्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले असेल आणि असे हे सहकार्य मिळवण्यात आपल्या बुद्धीचातुर्याने यशस्वी झालेले छत्रपती शिवाजी महाराज हे एक विलक्षण उदाहरण असल्याचं आपल्या सहज लक्षात येतं. बादशाहने महाराजांना जेव्हा काळ कोठडीत बंद केले आणि त्यानंतर छत्रपतींनी जो विचार केला, तो ज्या पद्धतीने केला- 'बालपणी आपल्या आईकडून ऐकलेल्या रामायण- महाभारतातील गोष्टींचा संदर्भ या ठिकाणी आपल्याला येऊ शकेल. महाभारतातील एका प्रसंगात अशाच प्रकारे लाक्षागृहामध्ये पांडवांना मारण्याचा जो एक अघोरी डाव रचला होता. त्यातून पांडव कसे बाहेर पडले याची काहीशी आठवण महाराजांच्या या आग्रा सुटकेतून दिसून येते. वर्तमानातील समस्यांचा सामना करताना भूतकालीन घटनांचा कसा उपयोग करायचा असतो, इतिहासातून नेमके काय आणि कसे शिकावे ही जी नवी दृष्टी आपल्याला महाराजांनी शिकवली, त्याचा खऱ्या अर्थाने आज आपण स्वीकार करण्याची गरज आहे. इतिहासाचा अभ्यास करताना आपण आपली दृष्टी कशी ठेवली पाहिजे याचं हे एक मूर्तिमंत उदाहरण आहे.पण आम्हीं इतिहासापासून काहीच शिकत नाही, उलट तो सतत आपण विसरताना दिसतो किंवा तो जाणून घेण्याची किंवा समजून घेण्याची आपली मानसिकता नसते. त्यामुळेच इतिहासात घडलेल्या चुका पुन्हा- पुन्हा होताना दिसतात. याची अनेक उदाहरणे इतिहासात मिळतात. तशीच ती वर्तमानतही दिसतात. पृथ्वीराज चव्हाण यांनी मुहम्मद घोरिला युद्धात अनेक वेळा पराभूत केले होते. प्रत्येक वेळी त्याला शरण आला किंवा दयेची याचना केली म्हणून सोडून दिले किंवा त्याला पळून जाऊ दिले. आपण परकीय अक्रमकांवर पराभूत केल्यावर अन्याय, अत्याचारही नाही केला. तोच मुहम्मद घोरी जेंव्हा पृथ्वीराज चव्हाणांना पराभूत करतो व पकडतो तेव्हा तो त्यांना सोडत नाही. त्यानंतर दक्षिण भारतातील समृद्ध अशा विजयनगरच्या साम्राज्यानेही बहामणी राजांना अनेक वेळा पराभूत केले होते. पण जेव्हा १५६५ च्या तालिकोटच्या युद्धात बहामनींचा विजय होतो तेव्हा ते पुढील सहा महिने विजयनगरची भयंकर लूट करतात ती इतकी असते की पुढे त्या प्रदेशाचे जंगलात रूपांतर होते. अगदी अलीकडच्या कालखंडात म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अनेक युद्धे झालीत. त्या युद्धांचा जरी आपण अभ्यास केला तर तिथे ज्या प्रकारे युद्धानंतर करार करण्यात आले त्या करारांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. उदा. अमेरिका-इराक युद्ध, शीतयुद्ध. कारण गेल्या सात दशकांमध्ये आपण पाकिस्तानला अनेक वेळा पराभूत केले व करार करून युद्ध थांबवले. पकडलेले सैनिकही सोडून दिले. पण कल्पना करा की जेव्हा आपल्या दुर्दैवाने एखाद्या युद्धात पाकिस्तानचा विजय झाला तर तो आपल्याशी याच प्रकारे वर्तन करेल याची खात्री देता येईल का? आपली इतिहास न अभ्यासण्याची व इतिहासाच्या अभ्यासातून योग्य बोध न घेण्याची दृष्टी दिसते.

प्रा.प्रशांत शिरुडे,
के.रा.कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
डोंबिवली.९९६७८१७८७६

# लोक काय म्हणतील..? मानसिक मॉब लिचिंग



वैष्णवी...तुझ्या मृत्युनंतर संपूर्ण पुणे शहर हादरवून गेले आहे. पुणे म्हणे तिथे काय उणे. आणि हो हे शिक्षणाचे माहेरघर. महाराष्ट्रातच नाहीत तर भारतातील नवनव्या क्रांतीची जन्मभूमी. आज तुझ्या मृत्यूने आणखी नव्या बदलांची गरज लक्षात आणून दिली आहे. पण यात तुझा मृत्यू नकोच होता. तसं आपला समाज मरणानंतरच एखाद्या गोष्टीच्या दाहकतेला संवेदनशीलतेने समजून घेतो. तुला ही कळालेच असेल तुझ्या मृत्युची दखल घेतली जात आहे. ही तुझ्या जगण्यासाठी असती तर कदाचित आपल्या महाराष्ट्राचे पुरोगामित्व सिद्ध झाले असते. वैष्णवी... बघ आता वेगवेगळ्या टी.व्ही चैनल यावर चर्चा होत आहे. सामाजिक, राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. सर्व मतमतांतरे समोर येत आहेत. सर्व सासर कडच्या लोकांना जबाबदार धरले जात आहे. खर सांगू वैष्णवी.... फक्त तुझाच त्रास, छळ आणि सहनशीलता आज समाजासमोर आली नाही. असंख्य मुलींचीही घुसमट तुझ्या माध्यमातून समोर येत आहे. संपूर्ण भारतात सशक्तीकरण होत आहे. सशक्तीकरण प्रक्रियेची कोणती बाजू कमकुवत पड़ली ज्यामुळे तुझा मृत्यू झाला. आणखी किती अबोल आणि दबावाखाली असणाऱ्या कितीतरी वैष्णवी आपल्या घुसमटलेल्या जगात जगत आहेत. त्यांची साधी विचारपूस ही होत नाही. जर एखादी मुलगी आपला त्रास सांगत असेल तर त्यात तिलाच जबाबदार धरले जात आहे. एवढंच काय तिचा उद्धटपणाच प्रखरपणे दाखवून दिला जातो. आणि आपल्या माहेरच्यांचे संस्कार निघतील. त्यांना खाली बघाव लागेल. अश्या अनेक प्रश्नांच्या चक्रव्यूहातुन तुला निघताच नाही आले. त्यालाच एक दुसर नाव देता येईल 'मानसिक मॉब लिचिंग'. वैष्णवी याच समाजाच्या 'मानसिक मॉब लिचिंग' ला तू घाबरली असशील. तुझा मृत्यू हत्या की आत्महत्या याचा तपास होतच राहिल. मी या तुझ्या मृत्यूला हत्या की आत्महत्या यात नाही ओढणार. पण तुझी झालेली मानसिक मॉब लिचिंग जास्त दिसून येते. मी तुझा बळी 'मानसिक मॉब लिचिंग' यातच पाहत आहे. कारण तुझ्या आसपासच्या समाजाला घाबरूनच तु सर्व त्रास सहन करत गेलीस. तुझी सहनशीलतेला शब्दांत व्यक्त करणं शक्य नाही. शारिरीक, मानसिक छळ सहन करत गेलीस. वेगवेगळे रिपोर्ट पाहून अस दिसत की, तुझे चारित्र्य हनन करण्याचीही धमकी दिली जात होती. यासमाजात स्त्रियांना जर नमवायचं असेल न वैष्णवी... 'चारित्र्य' हे अमोघ अस्त्र वापरलं जातं. यात कुणीही कधीही वाचू शकत नाही. खरच हे अस्त्र असे आहे की त्या स्त्रीच्या मृत्युनंतर ही त्याची तिव्रता कमी होत नाही. आणि हीच भीती कदाचित तुलाही होती. यासमाजात उजळ माथ्याने फिरता येणार नाही आणि अनेक प्रश्न तुझ्या हृदयाच्या कोर्पऱ्यात साठवून ठेवलेस. ज्याची उकल तु करूच शकली नाहीस. लोक काय म्हणतील? लोक काय करतील? याच प्रश्नांनी तुला नीट सांगू दिले नाही ना जगू दिले. हीच तर मानसिक मॉब लिचिंग' आहे.



डॉ. राजश्री तावरे (मस्के)
सहाय्यक प्राध्यापक
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

## जळकोटमध्ये आठवडी बाजारात पावसाने नागरिकांची तारांबळ

आरंभ मराठी | जळकोट



तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे शनिवारी दिवसभर चालू असलेल्या संततधार पावसामुळे बाजारासाठी आलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली.मागील चार-पाच दिवसांपासून जळकोट गावासह परिसरात मान्सून पूर्व अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. हवामान खात्याने पाच-सहा दिवस अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. त्याप्रमाणे मागील पाच-सहा दिवसांपासून अवकाळी पाऊस होत आहे. शनिवारी जळकोटचा आठवडी बाजार असतो. या बाजारासाठी परिसरातील अनेक गावातील नागरिक येतात. शनिवारी दिवसभर पाऊस असल्यामुळे बाजारासाठी आलेल्या नागरिकांची मोठी तारांबळ उडाली तसेच भाजीपाला व इतर साहित्य विक्रीसाठी आलेल्या शेतकरी व व्यापाऱ्यांची धावपळ झाली. या पावसामुळे बाजार रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी साचले होते.यामुळे चिखल होऊन बाजारात आलेल्या नागरिकांना त्रास सहन करावा लागला. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील दोन-तीन दिवस अवकाळी पाऊस होण्याची शक्यता आहे..



# हा मोसमी नव्हे,अवकाळी; शेतकऱ्यांनो,पेरणीसाठी थोडं थांबा खरीपासाठी नियोजन आणि दक्षता अत्यावश्यक

हर्षवर्धन मडके | मोहा

मोहा: मे महिन्याच्या उत्तरार्धात जिल्ह्यात सर्वत्र पावसाची रिपरिप सुरू झाली असून वातावरणात गारवा जाणवू लागला आहे. यामुळे अनेक शेतकरी ''मोसमी पाऊस आला'' या समजुतीत पेरणीच्या तयारीला लागले आहेत. मात्र, कृषी तज्ज्ञांच्या मते, हा पाऊस मोसमी नसून 'अवकाळी' असून यामध्ये पेरणी करणे धोकादायक ठरू शकते.

### खते आणि औषधांबाबत दक्षता

शेतकऱ्यांकडून तक्रारी येत आहेत की बाजारात बोगस खते व कीडनाशके विकले जात आहेत. त्यामुळे:
खरेदी करताना बिल घ्या.
शासकीय अधिकृत विक्रेत्याकडूनच खरेदी करा.
एखाद्या खताच्या रंग, गंध किंवा पॅकिंगबाबत शंका आल्यास विक्रेत्याकडून खुलासा मागा.

### मोसमी पाऊस' आणि 'अवकाळी पाऊस' यात फरक काय?

खरीप हंगामासाठीचा खरा पाऊस म्हणजेच मोसमी पाऊस साधारणतः जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू होतो. याच्या सुरुवातीस नियमित प्रमाणात व खालच्या दाबाच्या पट्ट्यांमुळे होणारा पाऊस पीक उगमासाठी पोषक ठरतो. तर दुसरीकडे, मे महिन्याच्या शेवटी होणारा पाऊस हा मुख्यतः तापमानातील चढउतार, आर्द्रता आणि वादळी परिस्थितीमुळे होणारा असतो. यामध्ये वरवर गारवा व जमिनीत ओलावा निर्माण झाल्यासारखा भास होतो, पण खऱ्या अर्थाने जमिनीत खोलवर आद्र्रता टिकून राहत नाही.

### पेरणीस घाई नको नियोजनाची गरज

पावसाची हलकी सर झाली की शेतकरी पेरणीच्या कामाला लागतात. मात्र, कृषी विभाग याविषयी सतर्क राहण्याचा सल्ला देत आहे. यंदा तापम ानात सातत्याने चढ-उतार होत असून, हवामान खात्याच्या अंदाजानुसार खरा पाऊस दोन ते तीन आठवड्यानंतर सुरू होण्याची शक्यता आहे.

बियाणे निवडताना ही काळजी घ्या
उच्च प्रतीची व प्रमाणित बियाणे वापरावीत. बियाण्यांची उगम क्षमता किमान ७५% पेक्षा अधिक असावी. पॅकेटवर ': प्रमाणपत्र', उत्पादन व वापरायची अंतिम तारीख, कंपनीचा पत्ता यांची खात्री करावी. शक्य असल्यास बियाण्यांची उगम चाचणी घ्यावी.

### संशय आल्यास तात्काळ तक्रार करा

कोणतेही बियाणे किंवा खते बोगस असल्याचा संशय आल्यास तात्काळ तालुका कृषी अधिकारी, कृषिसहाय्यक, मंडळकृषीअधिकारी यांच्याशी संपर्क साधा. त्यांच्याकडे तक्रार नोंदवून नमुना तपासणीसाठी पाठवता येतो. पावसाच्या प्रतीक्षेत शहाणपणाने वाट पाहा पेरणी एक दिवस लवकर झाल्याने उत्पादनात वाढ होत नाही, पण घाई केली तर संपूर्ण हंगामाचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे पावसाचे पहिल्या दोन-तीन सरींच्या नंतर जमिनीतील ओलाव्याची चाचणी घ्या आणि मगच शेतीची कामे हाती घ्या.

# लोमटे यांच्या हस्ते भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा तुगांव येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन लोमटे व त्यांच्या मित्रपरिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी नूतन जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी भाजपा ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र-गोवा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, माजी नगराध्यक्ष बालाजी कोरे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. अनिल काळे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पुनगडे, जिल्हा परिषद माजी सदस्या अंजलीताई बताळे उपस्थित होते. तसेच देवकन्या गाडे, आशाताई लांडगे, शशिकला मुंडे, अनिता तोडकर, शिवानी परदेशी, गुणवंत अप्पा सुतार, शिक्षक अंकुश जाधव, लहू शिंदे, गणेश पवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी दत्ताभाऊ कुलकर्णी यांना जिल्हाध्यक्षपदासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या व आगामी काळात त्यांच्या नेतृत्त्वाखाली पक्ष संघटन अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली देशाचे नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांची सदिच्छा भेट

नवी दिल्ली-देशाचे नूतन सरन्यायाधीश मा. न्या. भूषण रामकृष्ण गवई यांची नवी दिल्ली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सदिच्छा भेट घेतली. या भेटीत फडणवीस यांनी सरन्यायाधीश गवई यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.महाराष्ट्राला पुन्हा एकदा सरन्यायाधीशपदाचा मान मिळाल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले. या भेटीदरम्यान, श्री फडणवीस यांनी न्या. गवई यांना महाराष्ट्र विधानमंडळात सर्वपक्षीय सत्कार समारंभासाठी तसेच भारतीय संविधान या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्यान देण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले.

# लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस भरतीला प्राधान्य

## पोलीस दलाला बळकटी देणाऱ्या इमारतीचे उद्घाटन

आरंभ मराठी | सांगली



राज्यात आदर्श पोलीस प्रशासन निर्माण करण्यासाठी लोकसंख्येच्या अनुरुप पोलीसांची संख्या ठेवली जाणार आहे. त्यामुळे गृह विभागामार्फत नव्याने ४० हजार पोलीसांची भरती केली आहे. यापुढेही राज्यात पोलीस भरतीला प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.
सांगली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने बांधण्यात आलेल्या तीन इमारतींचे उद्घाटन व निवासस्थान इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.यावेळी राज्याचे उच्च शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, खासदार विशाल पाटील, आमदार सर्वश्री अरुण लाड, जयंत पाटील, डॉ. सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, डॉ. विश्वजीत कदम, गोपीचंद पडळकर, सत्यजीत देशमुख, सुहास बाबर, अमल महाडिक,मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी, विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोजकुमार शर्मा, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक (प्र) डॉ. शशिकांत म ाहूरकर, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक रितू खोखर आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पोलीस गृहनिर्माण महामंडळातर्फे राज्यातील पोलीस कार्यालय व पोलीसांच्या निवासस्थानासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे.सध्या ९४ हजार निवासस्थाने उपलब्ध झाली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात फॉरेंन्सिक व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येत असून सायबर गुन्ह्यांच्या उकलीमध्ये देशात महाराष्ट्र पोलीस अव्वल असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. अंमली पदार्थाच्या तस्करीत, व्यवसायात, पोलीसांचा सहभाग आढळल्यास संबंधीत पोलीसाला निलंबित न करता थेट बडतर्फ करण्याचा इशारा देत अंमली पदार्थांच्या बाबतीत झिरो टॉलरन्स असल्याचे त्यांनी सांगितले.राज्यात गुन्हेगार मोकाट सुटणार नाही हा विश्वास राज्यातील सामान्य माणसाला वाटेल अशा रितीने पोलीस विभाग कार्यरत राहील मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पोलीस गृहनिर्माण महामंडळाने राज्यातील निवासस्थाने अतिशय गुणवत्तापूर्वक उभी केली असल्याबद्दल त्यांनी पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी यांचे विशेष अभिनंदन केले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्ह्याचे पोलीस दल अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटीबध्द असून त्याला योग्य तो निधी दिला जाईल, तसेच जिल्ह्यात ड्रग्ज विरोधी म ोहिम प्रभावीपणाने राबविली जाईल. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त सुमारे २ कोटी १३ लाख इतक्या रुपयांच्या १६ वाहनांचे लोकार्पण त्याचबरोबर सायबर विभाग अधिक गतिशील व्हावा या उद्देशाने जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त झालेले सुमारे १५० संगणक, १५० स्कॅनर तर ४० मल्टी फंक्शन प्रिंटरचे सायबर विभागाला हस्तांतरण केले. तत्पूर्वी श्री. फडणवीस यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाची नवीन प्रशासकीय इमारत त्याचबरोबर कडेगाव व आटपाडी पोलीस ठाण्याच्या इमारतींचे उद्घाटन तर सांगली येथे पोलीसांसाठी उभारण्यात येणाऱ्या २२४ सदनिकांचे रिमोटद्वारे भुमिपूजन केले. जिल्ह्यात ६ उपविभाग कार्यरत असून सांगली व मिरज या दोन विभागाकरिता सदनिका मंजूर झाल्या आहेत. नवीन पोलीस मुख्यालय इमारतीमध्ये आधुनिक सुविधांनी युक्त कार्यालये, प्रशिक्षण हॉल्स, अधीक्षक कार्यालय, गुन्हे अन्वेषण विभाग, आणि कर्मचारी वसतिगृहे यांचा समावेश आहे.या नव्या सुविधांमुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कार्यात अधिक कार्यक्षमता येईल असा विश्वास व्यक्त करुन जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याला जिल्हा पोलीस दलाचे प्राधान्य असल्याचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी प्रास्ताविकामध्ये सांगितले.सांगली शहरामध्ये उभारण्यात आलेल्या या पोलीस अधीक्षक कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये जिल्हा पोलीस प्रमुखांचे कार्यालय, विविध शाखांचे स्वतंत्र विभाग, सुसज्ज कॉन्फरन्स हॉल, तांत्रिक सुविधांनी सज्ज विभाग, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा, महिलांसाठी स्वतंत्र कक्ष आदींचा सम ावेश आहे. ही इमारत पूर्णतः सीसीटीव्ही प्रणाली अंतर्गत सुरक्षित असून शाश्वत ऊर्जा वापराच्या दृष्टीने सौरऊर्जा सुविधांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. दिव्यांगांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा, प्रशस्त पार्किंग व स्वच्छतागृहे, ऊर्जा कार्यक्षम रचना व हरित इमारत, रेन वॉटर हर्वेस्टींग या संकल्पना राबविण्यात आली आहे.या इमारतीत चार मजले असून ५२४४ च.मी. इतके बांधकाम क्षेत्रफळ आहे. सुमारे १४ कोटी ३४ लाख रुपये खर्च झाला. या उद्घाटन सोहळ्याला पोलीस अधिकारी, कर्मचारी, आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन अपर पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी केले.

# नूतन प्राथमिक शाळेतील गरीब, अनाथ विद्यार्थ्यांना ५० हजाराचे गणवेश वाटप

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव : तिरुपती ट्रॅव्हल्स आणि गुड्स सर्व्हिसेस कंपनीच्या वतीने येथील नूतन प्राथमिक विद्यामंदिर या प्रशालेतील गरीब व अनाथ विद्यार्थ्यांसाठी ५०,००० रुपयांचे गणवेश भेट देण्यात आले. कंपनीच्या डायरेक्टर डॉ.अमृता निखिल कांदे-पाटील यांच्या हस्ते शनिवारी गणवेश वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. त्यांनी यावेळी प्रशालेतील दोन अनाथ विद्यार्थ्यांचे शिक्षणासाठी कायमस्वरूपी पालकत्व स्वीकारले. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमासाठी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या सरचिटणीस सौ. प्रेम ाताई सुधीर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील व शाळेचे मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष माळी यांनी केले तर आभार प्रदर्शन राम मुंडे यांनी केले.



# उमरगा येथे तिरंगा रॅलीतून एकात्मतेचा संदेश

आरंभ मराठी | उमरगा




भारत देशामध्ये जम्मू काश्मीर या भागामध्ये पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २७ पर्यटक मृत्युमुखी पडले. या हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानात घुसून दहशतवादी अड्डे जमीनदोस्त केले.भारतीय सैनिकांना या ऑपरेशनमध्ये यश मिळाले. भारतीय सैनिकाच्या या यशानंतर भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ उमरगा शहरात भाजपाच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये शहरातील व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.उमरगा येथील आदर्श महाविद्यालय येथून निघालेली ही भव्य तिरंगा रॅली प्रमुख महामार्गावरून हुतात्मा स्मारकच्या समोर या रॅलीची सांगता करण्यात आले.यावेळी विविध देशभक्तीपर गीत लावण्यात आले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्ती पुष्पहार अर्पण करण्यात आले. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी हातात तिरंगा घेऊन भारत माता की जय, वंदे मातरम, भारतीय जवानाचा विजय असो, जय जवान जय किसान अशा अनेक गगणभेदी घोषणा देण्यात आल्या.

## वाहनाच्या धडकेत पोलचे नुकसान,दुरुस्ती होईना,



धानुरी -जेवळी (ता.लोहारा) जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर अज्ञात वाहनाने धडक देऊन विद्युत पोल मोडला आहे. त्यानंतर गेली ५ दिवस याकडे ना विद्युत कर्मचारी ना अधिकारी फिरकाला ना सरपंच. या मुख्य रस्त्यालगत वस्ती आहे आणि सतत वर्दळ असणारा हा रस्ता आहे.

# जिल्ह्यात ३७ शेतरस्ते व पाणंद रस्ते झाले मोकळे

## सस्ती अदालतीमध्ये १६८ तक्रारी, मराठवाड्यात समूपदेशनातून ५६० प्रकरणे सामंजस्याने निकाली

आरंभ मराठी | धाराशिव

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते तसेच पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच प्रलंबित प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागामधील सर्व तालुक्यात सस्ती अदालत उपक्रम सुरू आहे. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या उपक्रमाम ुळे समूपदेशनातून तब्बल ५६० शेत रस्त्यांची प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली आहेत. या संदर्भात धाराशिव जिल्ह्यात १६८ तक्रारी प्राप्त झाल्या असून,त्यापैकी ३७ शेत रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. महसूलमंत्री श्री बावनकुळे यांच्या सूचनेनुसार मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील गरजू नागरिक शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्येक माहिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी सस्ती अदालत या नावाने हा उपक्रम सुरू आहे. विभागात ९ मे रोजी प्रथम सस्ती अदालत व २३ मे रोजी दुसरी सस्ती अदालत तहसिल कार्यालयात तसेच गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात आली. सस्ती अदालतीम



ध्ये काही प्रकरणात प्रत्यक्ष बांधावर जाऊन स्थळ पाहणी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनीदेखील अदालतीमध्ये ऑनलाईन सहभागी होत नागरीकांशी संवाद साधला.

### जिल्हानिहाय शेतरस्ते आकडेवारी

छत्रपती संभाजीनगरमध्ये प्राप्त १४१, निकाली ४४ तर शिल्लक प्रकरणे ९७
जालना - प्राप्त १०९, निकाली ३८ तर शिल्लक प्रकरणे ७१
परभणी- प्राप्त २४२, निकाली १४२ तर शिल्लक प्रकरणे १००
हिंगोली- प्राप्त ६१, निकाली २५ तर शिल्लक प्रकरणे ३६
नांदेड- प्राप्त १५३, निकाली ५९ तर शिल्लक प्रकरणे ९४
बीड- प्राप्त १२८, निकाली ५३ तर शिल्लक प्रकरणे ७५
लातूर- प्राप्त २७८, निकाली १६२ तर शिल्लक प्रकरणे ११६
धाराशिव- प्राप्त १६८, निकाली ३७ तर शिल्लक प्रकरणे १३१
एकूण- प्राप्त १२८०, निकाली ५६० तर शिल्लक प्रकरणे ७२०

# खासदार निधीतून उभारलेल्या सभामंडपाचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते लोकार्पण

आरंभ मराठी | धाराशिव



खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मौजे नंदगाव (ता. तुळजापूर) येथील निप्रश्री शांतलिंगेश्वर विरक्त मठ येथे १० लाख रुपये खर्चून सभामंडपाचे बांधकाम करण्यात आले. खासदार निधीतून लोकार्पण उत्साहात पार पडले. यावेळी महाराज राजशेखर महास्वामी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. सभामंडपाच्या उभारणीसाठी खासदार निधीचा उपयोग केल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यासभामंडपाचा उपयोग ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांसाठी तसेच सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांसाठी होणार आहे. कार्यक्रमानंतर गावकऱ्यांनी एकत्र येऊन ग्रामविकास, युवकांचा सहभाग आणि सामाजिक एकजुटीवर चर्चा केली. या कार्यक्रमास कमलाकर चव्हाण, अशोक भाऊ पाटील, गजेंद्र पाटील, प्रकाश चव्हाण, कृष्णाथ मोरे, सूर्यकांत अरबळे, परमेश्वर चिनगुंडे, गिरीश नवगिरे, राजेंद्र जाधव, सोमनाथ परशेट्टी, बाळू मारेकर, राजू मोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
आपलं धाराशिव....
रविवार दि.25 मे 2025


# रान झालं आबादानी, वाळणाऱ्या उसाला आशेची हिरवळ

## पाण्याअभावी पिवळा पडलेला ऊस झाला हिरवागार, सलग पाचव्या दिवशी मुरुड परिसरात संततधार पाऊस, नदी नाले भरले


पाऊस पडण्यापूर्वीची स्थिती


पाऊस पडल्यानंतर हिरवा झालेला ऊस

बालाजी मुळे | आरंभ मराठी

मुरुड; लातूर जिल्ह्यात गेल्या पाच दिवसापासून मुसळधार तसेच संततधार पाऊस पडत आहे. त्यामुळे काही भागात नुकसान झाले असले तरी काही शेतकऱ्यांना या पावसाचा फायदा होत आहे. उन्हाळ्यामुळे व मोठ्या प्रमाणात ऊस लागवडीसाठी पाणी उपसा केल्याने विहिरी व बोअरवेल कोरडे पडले होते. परिणामी मोठ्या प्रमाणात लागवड झालेल्या ऊस पिकाचे नुकसान होण्याची भीती असताना अवकाळी पावसाने ऊस पिकाला तारले असून, हिरव्यागार उसाने शिवार हिरवागार झाला आहे. शिवारातील बहुतांश ऊस वाळू लागल्याने यावर्षी उसाचे पीक हातचे जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु निसर्ग राजा शेतकऱ्यांच्या मदतीला धावला आणि मृग नक्षत्राच्या अगोदरच पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे पिवळा पडलेला ऊस हिरवागार दिसू लागल्याने शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू फुलल्याचे दिसून येत आहे. लातूर ग्रामीण हा मुख्यत्वे करून उसाचा पट्टा म्हणून ओळखला जातो. या भागामध्ये मांजरा सहकारी साखर कारखाना, विलास सहकारी साखर कारखाना, नव्याने सुरू झालेला तेरणा शेतकरी साखर कारखाना, रांजणी येथील कारखाना तसेच वाटवाडा येथील डीडीएनएसएफ लिमिटेड अशा कारखान्यांचे जाळे या परिसरामध्ये असल्याने उसाचे पीकही येथील शेतकरी मोठ्या प्रमाणात घेत असतात.ऊस लागवडीसाठी जमीन तयार करणे, उसाचे बेन विकत घेणे, त्यानंतर उसाला खतांचा व औषधांचा पुरवठा करणे व पाणी देणे यासाठी शेतकऱ्याचा मोठ्या प्रमाणात खर्च होत असतो. आणि गेल्या वर्षी चांगला पाऊस झाल्याने यावर्षी बहुतांश शेतकऱ्यांनी उसाची लागवड केली होती. परंतु सर्वच शेतकऱ्यांनी उसाची लागवड केल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपसा झाला परिणामी शेतातील विहिरी व बोर कोरडे पडले व ऊस वाळू लागले. त्यातच पावसाने कमाल केली व शेतकऱ्यांच्या तोंडचा जाणारा घास परत शेतकऱ्यांच्या तोंडात घातला म्हणून शेतकरी खुश झाला.या पावसामुळे रब्बीच्या पेरणीसाठी आवश्यक असणारी तयारी जरी थांबली असली तरी उसासाठी पावसाची गरज असल्याने वरून राजा प्रसन्न झाल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी २० कोटींचा निधी

आरंभ मराठी | मुंबई

### मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मृत शेतकऱ्याच्या संबंधित वारसाला वेळीच मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडून २० कोटीचा निधी सर्व विभागीय आयुक्तांना उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले, राज्यामध्ये नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेरीचा तगादा या तीन कारणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला मदत दिली जाते. महसूल, कृषी, गृह आणि सहकार विभागामार्फत तपासणी करून ही मदत दिली जाते. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला मदत करण्यासाठी विभागीय आयुक्त तथा नियंत्रक अधिकारी, कोकण यांना १२ लाख, पुणे- एक कोटी सहा लाख, नाशिक- तीन कोटी ३९ लाख, छत्रपती संभाजीनगर- चार कोटी ९२ लाख, अमरावती- सहा कोटी ७६ लाख आणि नागपूर विभागीय आयुक्त यांना तीन कोटी ७५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे.राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेला हा २० कोटींचा निधी मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता राज्यातील उर्वरीत जिल्हाधिकाऱ्यांना विभागीय आयुक्तांमार्फत वितरीत करण्यात येणार आहे. उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्यास मान्यताआत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास तातडीने मदत देण्यासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

# संगीत ऐकल्यावर नवचैतन्य निर्माण होते-कृषिमंत्री कोकाटे

## सोमेश्वर फाऊंडेशनच्या आयोजित पुणे आयडॉल स्पर्धेचा समारोप

आरंभ मराठी | कोल्हापूर



संगीत म्हणजे आनंदाचा एक मेळा. कोणतेही संगीत ऐकल्यावर लगेच आपल्या मनावर त्याचा परिणाम होतो. एक नवचैतन्य निर्माण होते. गाण्याचा छंद जोपासून अनेक पुणेकरांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये आपला ठसा उमटविला आहे. पुणेकरांच्या गायनाच्या छंदाला गेली २३ वर्षे सोमेश्वर फाऊंडेशनमार्फत सनी निम्हण प्रेरणा देत आहेत. याबद्दल समाधान आहे, अशी भावना राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज व्यक्त केली. कार्यसम्राट आमदार स्व. विनायक निम्हण यांनी गायक कलाकारांना दिलेले मानाचे व्यासपीठ म्हणजे सोमेश्वर फाऊंडेशन आयोजित पुणे आयडॉल स्पर्धा. या स्पर्धेची महाअंतिम फेरी आज बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे संपन्न झाली. यावेळी कृषिमंत्री कोकाटे बोलत होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, संयोजक सनी विनायक निम्हण आदी मान्यवर उपस्थित होते. पुणे आयडॉल स्पर्धेच्या निमित्ताने दरवर्षी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या व गायन कला जोपासणाऱ्या व्यक्तींचा 'व्हाईस ऑफ चॉइस' पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. यंदा डॉ. विनय थोरात, शिवानी पांढरे, निलेश निकम, ॲड. शीतल कुलकर्णी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.चंद्रकांत पाटील म्हणाले, एखादा उपक्रम सुरू करणे सोपे असते. मात्र तो सातत्याने आणि तेव्हढ्याच दिमाखात सुरू ठेवणे कठीण आहे. परंतु स्वर्गीय आमदार विनायक निम्हण यांनी पुणे आयडॉल ही स्पर्धा सुरू केली अन् गेल्या २३ वर्षांपासून ही अशीच सुरू आहे. सनी निम्हण यांनी त्यांचा सामाजिक आणि राजकीय वारसा दोन्ही घेतला आहे. या स्पर्धेत पुणे शहरात व्यतिरिक्त इतर शहर आणि राज्यातून देखील स्पर्धक आलेले आहेत. यातच या स्पर्धेचे यश आहे.प्रास्ताविकात सनी निम्हण म्हणाले, पुणे आयडॉल या स्पर्धेच्या अंतिम फेरीत ७२५ स्पर्धकांमधून १८ स्पर्धक निवडण्यात आले. त्यांची निवड करताना परीक्षकांचाच कस लागला आहे. पुणे आयडॉल ही केवळ स्पर्धा नसून आपले गायन कौशल्य सादर करण्याचे एक महत्त्वाचे व्यासपीठ बनले आहे. पुणे आयडॉल स्पर्धेतील चारही गटाच्या प्रथम विजेत्यास १५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र तर द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना प्रत्येकी दहा हजार रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

# डॉ.महेश गुरव यांची 'मॅग्मो'च्या राज्य सहसचिव पदावर निवड

आरंभ मराठी | मुंबई



महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट 'अ' (MAGMO) संघटनेच्या राज्य कार्यकारिणीमध्ये डॉ.महेश गुरव यांची राज्य कार्यकारिणी सहसचिव पदावर निवड करण्यात आली आहे.सदर निवडीबाबत संघटनेच्यावतीने त्यांना हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. संघटनेच्या वतीने ही नियुक्ती करताना त्यांच्या कार्यक्षमता व अनुभवाची दखल घेण्यात आली आहे.ही नियुक्ती डॉ. संतोष इंडोळे (सरचिटणीस), डॉ. राजेंद्र पवार (कोषाध्यक्ष), डॉ. निलेश टापरे (राज्य प्रमुख समन्वयक) आणि डॉ. राहुल कन्नमवार (अध्यक्ष) यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे.राज्य कार्यकारीणी सदस्य डॉ सचिन देशमुख, राज्य उपाध्यक्ष डॉ दिपक मेंढेकर, डॉ रफीक अन्सारी आणि डॉ.पुरुषोत्तम पाटील यांचे मार्गदर्शन मिळणार असल्याने काम करताना शिकायला मिळेल, असा विश्वास डॉ. महेश गुरव यांनी व्यक्त केला. तर संघटनेच्या उज्वल भविष्यासाठी डॉ.महेश गुरव यांचे योगदान मोलाचे ठरेल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

# हरियाणा येथील शौर्य दिनाला लाखो मराठे उपस्थित राहणार

आरंभ मराठी | कोल्हापूर



प्रतिवर्षी हरियाणा येथे पानिपत या शौर्य स्थळावर शौर्य दिन साजरा केला जातो. देव,देश व धर्माच्या रक्षणासाठी महाराष्ट्रातील मराठी सैनिकांनी बलिदान दिले आहे. यापैकीच प्रमुख लढाई म्हणजे पानिपतचे युद्ध. मराठा सैनिकांच्या पराक्रमामुळे आक्रमणकर्ता अब्दाली येथून परत गेला होता. यासाठी प्रतिवर्षी १४ जानेवारीला शौर्य दिन साजरा केला जातो. महाराष्ट्राच्या मातीतून देश रक्षणासाठी दिलेले बलिदान हे अविस्मरणीय आहे. या शौर्य स्थळावर प्रतिवर्षी मराठा बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून प्रसन्न शिंदे शिराळकर पूर्वजांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यासाठी आयोजन करतात.पुढीलवर्षी पानिपत येथे शौर्य स्थळावर महाराष्ट्रातील लाखो मराठे उपस्थित राहणार आहेत. पानिपत येथे मराठा बांधवांनी मोठ्या प्रमाणावर यावे, यासाठी हरीयाणा शौर्य दिन कार्यक्रमाचे संयोजक जगदीश तोरणे, सुलतानराव तोरणे,अमित गायकवाड, सातारा येथील रवी चव्हाण कोल्हापूरला आले होते. त्यांनी महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मराठा बांधवांना शौर्य दिनाचे आमंत्रण दिले.मराठा बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून प्रसन्न शिंदे शिराळकर, उदय लाड, निरंजन शिंदे, विकास सुर्वे, किशोर शिंदे हे पानिपत मोहिमेचे आयोजन करत असतात.महाराष्ट्र व हरियाणा येथील मराठी समाज एकमेकांना जोडला जावा यासाठी जगदीर तोरणे, प्रसन्ना शिंदे हे प्रयत्नशील असतात. हरियाणातील मराठी बांधवांसोबत आई अंबाबाईचे, जोतिबाचे दर्शन घेऊन छत्रपती शाहू महाराजांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी येणारा शौर्य दिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातून प्रसन्न शिंदे, किशोर घाटगे, विकास सुर्वे, निरंजन शिंदे, योगेश केरकर, किशोर शिंदे, विकास जाधव, विक्रमसिंह जरग, नितीन पन्हाळकर यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योग्य ते नियोजन करण्याचे ठरविले आहे.

# काँग्रेसच्या अनेक नगरसेवकांचा लवकरच शिवसेना प्रवेश

## सत्यजित कदम यांची पत्रकार परिषदेत माहिती

आरंभ मराठी | कोल्हापूर



काँग्रेसमधील अनेक नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर हे काँग्रेसच्या त्या नगरसेवकांच्या शिवसेना प्रवेशाची कोंडी फोडतील. लवकरच त्या नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश होईल, असे शिवसेनेचे जिल्हा समन्वयक सत्यजित कदम यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले.श्री. कदम म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे शहर विकासाला मोठया प्रमाणात निधी मिळावा यासाठी पाठपुरावा केला होता. पालकमंत्री आबिटकर, आमदार क्षीरसागर यांच्या माध्यमातून निधीसाठी प्रयत्न केले होते. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे शहर विकासासाठी निधी मागितला होता. विविध विकासकामांना मिळून १०० कोटी रुपयांचा निधी कोल्हापूरसाठी द्यावा, अशी मागणी केली होती. पहिल्या टप्प्यात २४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यामधून रुईकर कॉलनी येथील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याभोवती स्मारक साकारण्यात येणार आहे. त्याकरिता दोन कोटी रुपयांची तरतूद आहे. शिवाजी पेठेतील फिरंगाईदेवी मंदिर विकासकामासाठी दोन कोटी रुपये मंजूर आहेत. शहरातील अन्य विकासकामासाठी निधी उपलब्ध केला आहे. विधानसभा निवडणुकी दरम्यान शहरवासीयांनी विविध विकासकामे सुचविले होते. पुराचे पाणी जाते त्या ठिकाणी काँक्रिटच्या रस्त्यासाठी निधी मंजूर केला आहे. आगामी महापालिका निवडणुकीसंदर्भात मुंबईत नुकतीच बैठक झाली. पालकमंत्री आबिटकर व आमदार क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुका लढविल्या जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीला जिल्ह्यात महायुतील मोठे यश मिळाले. त्याच यशाची पुनरावर्ती स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुती करेल, असा आशावादही कदम यांनी व्यक्त केला. काँग्रेसच्या अनेक नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश होणार आहे. प्रवेशाची कोंडी लवकरच फुटेल असेही ते म्हणाले.पत्रकार परिषदेला माजी नगरसेवक विजय सूर्यवंशी, आशीष ढवळे, शेखर कुसाळे, वैभव माने आदी उपस्थित होते.

# तिरंगा यात्रेमध्ये भारतीय सैन्याच्या शौर्याला अभिवादन

आरंभ मराठी | कोल्हापूर



भारतीय सैन्यदलाप्रति कृतज्ञता आणि सैनिकांच्या अतुलनीय शौर्याला सलाम करण्यासाठी शहरात काँग्रेसची तिरंगा यात्रा संपन्न झाली. या तिरंगा यात्रेमध्ये खासदार शाहू महाराज छत्रपती, आमदार जयंत आसगांवकर, माजी आमदार ऋतुराज संजय पाटील, राजूबाबा आवळे यांच्यासह मान्यवर सहभागी झाले होते. राजर्षी शाहू महाराजांच्या समाधीस्थळाला अभिवादन करून सुरु झालेल्या या यात्रेमध्ये महापालिका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. अत्यंत उत्साहपुर्ण या वातावरणात भारतमातेचा आणि सशस्त्र दलाच्या तिन्ही दलांसाठी जयघोष केला.यावेळी जि. प. माजी अध्यक्ष राहुल पाटील-सडोलीकर, गोपाळ पाटील, काँग्रेस शहराध्यक्ष सचिन चव्हाण, राहूल देसाई, शशांक बावचकर, राजू लाटकर, गोकुळचे संचालक बाबासो चौगले, बयाजी शेळके, माजी नगरसेवक राहुल माने, मधुकर रामाणे, संजय मोहिते, ईश्वर परमार, दुर्वास कदम, तौफीक मुल्लाणी यांच्यासह विद्याधर गुरबे, विनायक घोरपडे, संदीप पाटील, संतोष पाटील अनंत पाटील, माजी सैनिक, एन. एन. पाटील, अशोक माळी, रघुनाथ पाटील, शशिकांत साळोखे, रत्नाकर शिरोळे, तानाजी चव्हाण, शिवाजी पाटील यांच्यासह माजी नगरसेवक, नगरसेविका आणि जिल्हाभरातील काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भैरवनाथ मंदिराच्या पुजाऱ्याचा खंडणी मागितल्याचा आरोप, कुटुंबियांसमवेत तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू

आरंभ मराठी | परांडा




कंडारी येथील भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे बाळासाहेब पडघन यांनी अरुण पुजारी यांच्या कुटुंबीयांकडे खंडणी मागितली व मंदिरातील धार्मिक विधी करण्यापासून दमदाटी करून वंचित ठेवल्या प्रकरणी अरुण क्षीरसागर पुजारी कुटुंबीयांनी २४ मे पासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. अरुण क्षीरसागर यांच्याकडे गेल्या सात पिढ्यापासून भैरवनाथ मंदिराची पूजाअर्चा सेवा करण्याचा मान आहे. अक्षयतृतीया पासून भैरोबा देवाची पूजा आजच्या करण्यास व सेवा करण्यामध्ये बाळासाहेब पडघम अडथळा आणतात असा आरोप अरुण क्षीरसागर यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. यासंदर्भात धर्मादाय आयुक्त, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याकडेही पुजारी यांनी निवेदने दिली आहेत.भैरोबा देवाची सेवा करण्याच्या मान पुजारी कुटुंबीयांना असताना सुद्धा देवस्थान समितीचे अध्यक्ष वेळोवेळी पैशाची मागणी करतात, मंदिरात राहू देण्याची भाषा करतात त्यामुळे आम्हाला रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. यासंदर्भात कॉल रेकॉर्डिंग ही व्हायरल झाली होती. मनुष्यबळाच्या जोरावर मंदिरातून बाहेर काढून गावात न राहू देण्याची भाषा ही पडगम बोलत आहेत असा आरोप क्षीरसागर कुटुंबियांनी केला आहे. त्यांच्या आशा दमदाटीमुळे कुटुंबातील १४ लोकांचे जगणे अवघड झाले आहे. न्याय न मिळाल्यास कुटुंबातील सर्वजण आत्मदहन करणार असल्याचा इशाराही अरुण पुजारी क्षीरसागर यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे. यांच्या उपोषणाबाबत तहसील प्रशासन नेमकी काय भूमिका घेत याकडे मात्र सर्व तालुक्याचे लक्ष लागले आहे.